# ( जाहिरात क्रमांक - 1)
# जिल्हा परिषद, कोल्हापूर संचलित
## राजर्षी शाहू छत्रपती विद्यानिकेतन व निवासी क्रीडा प्रशला, शिंगणापूर, ता- करवीरकडे निव्वळ कंत्राटी पध्दतीची तात्पुरत्या स्वरपातील मानधन तत्वावर खो-खो प्रमुख प्रशिक्षक, कुस्ती प्रमुख प्रशिक्षक, रग्बी प्रशिक्षक मैदानी सहाय्यक प्रशिक्षक, रेक्टर (महिला व पुरुष )व कनिष्ठ लिपिक
## भरती जाहिरात 2025-2026

जिल्हा परिषद, कोल्हापूर संचलित राजर्षी शाहू छत्रपती विद्यानिकेतन व निवासी क्रीडा प्रशला, शिंगणापूर, ता-करवीरकडे निव्वळ 11 महिन्यासाठी कंत्राटी पध्दतीची तात्पुरत्या स्वरपातील मानधन तत्वावर खो-खो प्रमुख प्रशिक्षक, कुस्ती प्रमुख प्रशिक्षक, मैदान सहाय्यक प्रशिक्षक, रग्बी प्रशिक्षक रेक्टर (महिला व पुरुष )व कनिष्ठ लिपिक नियुक्ती करण्यात येणार आहे. तसेच कबड्डी मुख्य प्रशिक्षक व कबड्डी सहाय्यक प्रशिक्षक वगळून (मागील वर्षी मुलाखतीव्दारे नियुक्ती दिलेली असल्याने)

जाहिरातीमधील शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता पुर्ण अशा पात्र उमेदवारांनी स्वच्छ व सुंदर अक्षरात लेखी अथवा टंकलिखीत A-4 कागदावर अर्ज **दि. 05/08/2025 ते दि.14/08 /2025 अखेर सकाळी 11.00 ते सायंकाळी 4.00** वाजेपर्यंत सुटटीच्या दिवशीही समक्ष अथवा पोष्टाने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर येथे स्विकारले जातील. विहीत मुदतीनंतर आणि विहीत वेळेनंतर प्राप्त होणारे अर्ज स्विकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी. सदरची भरतीची जाहिरात जिल्हा परिषद कोल्हापूरच्या www.zpkolhapur.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| अ. क्र. | पदाचे नांव | शैक्षणिक अर्हता | दिवस / वार | मासिक मानधन |
|---|---|---|---|---|
| 1 | खो-खो प्रमुख क्रीडा प्रशिक्षक | एन.आय.एस. (खो-खो खेळ). पदविका प्राप्त तीन वर्षे प्रशिक्षणाचा अनुभव अथवा बी.पी.एड. (BPEd) / एम.पी.एड (MPEd) व खो-खो खेळातील मान्यताप्राप्त स्पर्धेमध्ये राष्ट्रीय पदक विजेता खेळाडू आणि तीन वर्षे खो-खो खेळाच्या प्रशिक्षणाचे अनुभव असणे आवश्यक आहे. | मासिक एकत्रित मानधन | 20,000/- |
| 2 | कुस्ती प्रमुख क्रीडा प्रशिक्षक | एन.आय.एस. (कुस्ती खेळ). पदविका प्राप्त व तीन वर्षे प्रशिक्षणाचे अनुभव अथवा बी.पी.एड. (BPEd) / एम.पी.एड (MPEd) व कुस्ती खेळातील मान्यताप्राप्त स्पर्धेमध्ये राष्ट्रीय पदक विजेता खेळाडू आणि तीन वर्षे कुस्ती खेळाच्या प्रशिक्षणाचे अनुभव असणे आवश्यक आहे. | मासिक एकत्रित मानधन | 20,000/- |
| 3 | मैदानी सहाय्यक प्रशिक्षक | एन.आय.एस. मैदानी स्पर्धा प्रशिक्षक पदविका प्राप्त व तीन वर्षे प्रशिक्षणाचे अनुभव अथवा बी.पी.एड. (BPEd) / एम.पी.एड (MPEd) व मैदानी खेळातील मान्यताप्राप्त स्पर्धेमध्ये राष्ट्रीय पदक विजेता खेळाडू आणि तीन वर्षे कब्बडी खेळाच्या प्रशिक्षणाचे अनुभव असणे आवश्यक आहे. | मासिक .एकत्रित मानधन | 12,000/- |
| 4 | रेक्टर (महिला) | एम.एस. डब्लु आवश्यक बी.पी.एड. असल्यास प्राधान्य | मासिक एकत्रित मानधन | 12,000/- |
| 5 | रेक्टर (पुरुंष) | एम.एस. डब्लु आवश्यक बी.पी.एड. असल्यास प्राधान्य | मासिक एकत्रित मानधन | 12,000/- |
| 6 | रग्बी क्रीडा प्रशिक्षक | बी.पी.एड. (BPEd) / एम.पी.एड (MPEd) / एन.आय.एस. (रग्बी खेळ). पदविका किंवा वर्ल्ड रग्बी परीक्षा पास तसेच आंतरराष्ट्रीय वरिष्ठ खेळाडू तसेच तीन वर्ष प्रशिक्षणाचा अनुभव | मासिक एकत्रित मानधन | 10,000/- |
| 7 | कनिष्ठ लिपिक | पदवीधर, MS CIT, संगणक ज्ञान, मराठी व इंग्रजी टायपिंग तसेच कार्यालयीन कामकाजाचा अनुभव | मासिक एकत्रित मानधन | 12,000/- |

**अटी व शर्ती आणि विशेष सुचना** खालीलप्रमाणे आहेत.

1) अर्जात पत्रव्यवहाराचा पत्ता जवळच्या खुणेसह (Land Mark) नमूद करावा. तसेच संपर्कासाठी भ्रमणध्वनी क्रमांक आणि स्वत:चा ई मेल आयडी नमूद करावा.
2) उमेदवाराला मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
3) अपुर्ण आणि चुकीची माहिती भरलेले अर्जाचा विचार केला जाणार नाही आणि त्याबाबत कोणत्याही प्रकारचा कार्यालयाकडून पत्रव्यवहार केला जाणार नाही.

4) क्रीडा प्रशिक्षकांना विद्यानिकेतन व निवासी क्रीडा प्रशालेकडे दररोज सकाळी 06.00 ते 9.00 आणि सायंकाळी 4.00 ते 7.00 या वेळेत तसेच वेळोवेळी आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यासोबत स्पर्धेसाठी सरावासाठी उपस्थित राहणे बंधनकारक आहे.
5) क्रीडा प्रशिक्षकांनी सुटटीमध्येदेखील काम करणे बंधनकारक राहील.
6) उमेदवारांने निवासी राहणे बंधनकारक आहे.
7) निव्वळ कंत्राटी मानधन तत्वावरील 11 महिन्यासाठी नियुंक्ती असलेने कोणत्याही परिस्थीतीत उमेदवाराला सेवेत कायम करणे किंवा नियमित सेवेचा लाभ मिळणार नाही. तसेच कायमस्वरूपाची नियुक्ती दिली जाणार नाही.
8) निवड झालेल्या उमेदवाराला रु. 500/- स्टॅम्पपेपरवर करारपत्र करुन देणे बंधनकारक राहील.
9) सदरच्या पदासाठी आवश्यक असणारी सर्व कागदपत्रे सत्यप्रत करुन अर्जासोबत जोडावे लागेल. कागदपत्रे सत्यप्रत करुन न जोडलेस अर्ज / उमेदवाराला अपात्र ठरविले जाईल.
10) पात्र उमेदवारांची यादी जिल्हा परिषद, कोल्हापूरकडील नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येईल.
11) अर्जावर अलिकडचा फोटो लावून तो राजपत्रित अधिकारी/विशेष कार्यकारी अधिकारी / मुख्याध्यापक / प्राचार्य यांचेकडून सांक्षाकित करणे बंधनकारक आहे.
12) मागास प्रवर्गातील उमेदवार असतील तर त्यांनी अर्जासोबत जात वैधता प्रमाणपत्र अथवा जात प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील.
13) अर्जाच्या लिफाफ्यावर ज्या पदासाठी अर्ज सादर केलेला आहे त्या पदाचा / खेळाचा उल्लेख करावा.
14) उमेदवाराला लेखी अथवा तोंडी मुलाखातीसाठी कोणत्याही प्रकारचा भत्ता कार्यालयाकडून दिला जाणार नाही.
15) उमेदवार नियुक्त केलल्या उमेदवाराचा कालावधी पुर्ण झालेनंतर मुदतवाढ देणे अगर कसे याबाबतचा निर्णय कार्यालयाने राखून ठेवला आहे.
16) भरतीबाबतची जाहिरात वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येईल.
17) निवडीबाबत राजकीय किंवा इतर कोणत्याही प्रकारचा दबाव किंवा शिफारस आणल्यास त्या उमेदवाराल अपात्र ठरविण्यात येईल.
18) महाराष्ट्र शासन निर्णय क्र. रिपभ/प्र.क्र.66/2011/ई-10,दि. 27 जून 2011 नुसार उमेदवार हा महाराष्ट्र राज्यातील असणे आवश्यक आहे. त्यासाठी डोमीसाईल / जन्म दाखला / शाळा सोडल्याचा दाखला यापैकी एकावर महाराष्ट्रातील जन्माची नोंद असलेला पुरावा अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे.
19) सेवा योजन कार्यालय, आदिवासी प्रकल्प अधिकारी, जिल्हा अधिकारी कार्यालय यांचेकडून प्राप्त होणा-या जनगणना, अंशकालीन कर्मचारी, प्रकल्पग्रस्त, माजी सैनिक, जिल्हा सैनिक कल्याण बोर्ड यांचेकडून शिफारस होणा-या उमेदवारांनी त्यांचे शैक्षणिक पात्रतेनुसार जाहिरातीप्रमाणे अर्ज करणे बंधनकारक आहे.
20) प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त उमेदवारांनी संबंधित जिल्हयातील मा. जिल्हाधिकारी / जिल्हा पुनवर्सन अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्राच्या सत्यप्रत अर्जासोबत जोडणेच्या आहेत. अन्यथा अर्ज अपात्र समजण्यात येईल.
21) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागकडील दि. 01 जुलै 2005 नुसार लहान कुटुब असलेचे प्रमाणपत्र सोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये अर्जासोबत स्वतंत्ररित्या जोडणे बंधनकारक आहे.
22) सदरची नियुक्ती ही 11 महिन्याची कंत्राटी स्वरुपाची मानधन तत्वावरिल असलेने उमेदवाराचे काम समाधानकारक नसलेस कोणतेही कारण किंवा लेखी सुचना न देता दिलेली नियुक्ती आदेश रद्द करण्यात येईल. याबाबत कोणत्याही प्रकारे आणि कोठेही तक्रार करता येणार नाही, आणि राजकीय दबाव आणता येणार नाही.
23) जर उमेदवाराला कंत्राटी नियुक्तीच्या आदेशातून कार्यमुक्त होणेचे असलेस एक महिन्याची नोटीस कार्यालयाकडे देणेचे आहे. किंवा एक महिन्याचे मानधन कार्यालयाकडे जमा करणे आवश्यक आहे.
24) नियुक्ती दिलेल्या उमेदवाराने नियुक्ती आदेश दिलेनंतर सात दिवसात सेवेत हजर होणे बंधनकारक आहे. अथवा नियुक्ती आदेशाबाबत कार्यालयाकडे पत्रव्यवहार करणे आवश्यक आहे.
25) अटी व शर्तीमध्ये वाढ अथवा कमी किंवा त्यामध्ये बदल करणेचा अधिकार कार्यालयाने राखून ठेवला आहे.
26) नियुक्तीचे सर्व अधिकार जिल्हा परिषद कोल्हापूर ने आपल्याकडे राखून ठेवले आहेत.

सही/-
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, कोल्हापूर

सही/-
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, कोल्हापूर.

## **नमूना खाली दिला आहे.**

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम 2005 मधील प्रतिज्ञा प्रत्राचा नमूना-अ

मी श्रीमती / श्री / कुमारी..........................................................................................

श्री........................................................................................................ यांची पत्नी / पती / मुलगा / मुलगी वय .......... वर्ष राहणार ...................................................................................................... याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो करते कि -

1) मी ...................................................... या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

2) आज रोजी मला..................... (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दि. 28 मार्च 2005 तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या .................. आहे. (असल्यास जन्म दिनांक नमूद करावा)

3) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दि. 28 मार्च 2005 तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी ती अनर्ह ठरविण्यास पात्रा होईन याची मला जाणीव आहे.

ठिकाण :- उमेदवाराची सही/-

दिनांक :- / /2025. उमेदवाराचे संपुर्ण नांवः------------------------------------------

| |
|---|
| उमेदवाराने अलिकडील काळातील पासपोर्ट साईज फोटो लावावा व तो राजपत्रित/विशेष कार्यकारी अधिकारी / प्राचार्य / मुख्याध्यापक यांचेकडून साक्षांकित करावा. |

## शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर.

## अर्जाचा नमूना

## कंत्राटी मुख्य / सहाय्यक कब्बडी क्रीडा प्रशिक्षक पदासाठी अर्ज 2025-26.

**प्रति,**

मा. सदस्य सचिव, कार्यकारी नियामक मंडळ समिती,कोल्हापूर.
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर.

**भरतीचे पदाचे नांव :- खो-खो प्रमुख प्रशिक्षक, कुस्ती प्रमुख प्रशिक्षक, मैदानी सहाय्यक प्रशिक्षक, रग्बी प्रशिक्षक, रेक्टर (महिला व पुरुष ) व कनिष्ठ लिपिक**

1) उमेदवाराचे संपुर्ण नांव :- आडनांव स्वत:चे नांव वडिलांचे नांव
--------------------- ----------------------- ------------------------

2) उमेदवाराचे नावात बदल असलेस:- आडनांव स्वत:चे नांव वडिलांचे नांव
-------------------------- --------------------- ------------------------

3) लग्नानंतर नांव बदलेले असल्यास (महिला उमेदवारासाठी गॅझेटसह पुरावा जोडावा)
नांव :-----------------------------------------

4) पत्रव्यवहाराचा पत्ता (मोबाईल नंबर व ई मेल आयडीसह) --------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------पिन कोडा नं. ---------------

5) जात :- ...................................... पोट जात :- ........................................................

6) आवश्यकत्या ठिकाणी अशी ( √ ) खुण करावी

| माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | अपंग | अंशकालीन |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

7) अर्जदाराची जन्म तारीख (अंकामध्ये) (शालांत प्रमाणपत्राप्रमाणे)

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

8) उमेदवाराचे अर्ज स्विकारणेच्या अंतिम दिनांकास / /2025.
रोजी असलेले वय

| वय वर्ष | महिना | दिवस |
|---|---|---|
| | | |

9) महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात काय? पुरावा जोडला आहे काय?

| होय | नाही |
|---|---|
| | |

10) अर्जदार

| स्त्रि | पुरुष, |
|---|---|
| | |

| विवाहीत | अविवाहित |
|---|---|
| | |

11) शैक्षणिक पात्रता :- (उत्तीर्ण झालेल्या परिक्षेचा तपशिल)

| शैक्षणिक पात्रता | परिक्षा मंडळाचे नांव | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | एकूण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

12) नांव नोंदणी केलेल्या सेवा योजन कार्यालयाचे नांव :-

13) नोंदणी क्रमांक :- व दिनांक :-

वर नमूद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे सत्य व अचूक बरोबर आहे. मी प्रमाणित करतो / करते कि, अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आलेस अर्ज अपात्र करणेस, नियुक्ती मागणेस व त्या अनुषंगाने होणा-या इतर कारवाईस मी पात्र व बांधील राहीन.

ठिकाण :- सही/-
दिनांक :- / /2025 (अर्जदाराचे संपुर्ण नांव :-.................................................)

| | |
|---|---|
| **राजर्षी शाहू छत्रपती विद्यानिकेतन व निवासी क्रीडा प्रशाला, शिंगणापूर (चंबुखडी), ता- करवीर, जिल्हा कोल्हापूर** | प्रवेशपत्र - 2025.<br>अहस्तांतरीय |
| उमेदवाराचे संपुर्ण नांव :- ------------------------------------------------<br><br>पदाचे नांव :- ............................................<br><br>उमेदवाराची स्वाक्षरी | उमेदवाराने अलिकडील काळातील पासपोर्ट साईज फोटो लावावा व तो राजपत्रित/ विशेष कार्यकारी अधिकारी / प्राचार्य / मुख्याध्यापक यांचेकडून साक्षांकित करावा. |
| | सदस्य सचिव, कार्यकारी नियामक मंडळ समिती,कोल्हापूर. तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर. |